अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

# निवडणुका म्हणजे बड्या धेंडांचा आखाडा

सध्या पाच विधानसभा निवडणुकींचा प्रचार जोरात सुरू आहे. या प्रचार काळात उमेदवारांकडून किंवा राजकीय पक्षांकडून केल्या जाणाऱ्या खर्चावर निवडणूक आयोगाचे बारीक लक्ष आहे. यातले अनेक उमेदवार करोडपती आहेत. निवडणूक आयोगाने कितीही नियम घातले असले तरी प्रत्यक्षात प्रचारामध्ये पाण्यासारखा पैसा खर्च होताना दिसतो आहे. यासंदर्भात उमेदवाराने किंवा पक्षाने किती खर्च करावा. यासाठी केंद्र सरकारने १९७४ साली लोकप्रतिनिधित्व (सुधारणा) अध्यादेश लागू केला. या अध्यादेशाद्वारे या कायद्यातील तरतूदींमध्ये सुधारणा केल्या गेल्या. कारण ही सारी परिस्थिती पाहून जनहितासाठी एका व्यक्तीने सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली होती. १९७४ मधील अध्यादेशापूर्वी निवडणूक मदतीबाबत कायद्याची जी स्थिती होती तीच पुन्हा स्थापित करावी, अशी विनंती त्यांनी सर्वोच्च न्यायालयात केली. सर्व निवडणुका स्वच्छ व पारदर्शी होण्यासाठी एखाद्या उमेदवाराच्या निवडणुकीसंदर्भात एखाद्या राजकीय पक्षाने किंवा एखाद्या संघटनेने किंवा लोकांच्या गटाने किंवा एखाद्या व्यक्तीने केलेला खर्च हा त्या उमेदवाराने किंवा त्याच्या निवडणूक एजंटने केलेला खर्च म्हणून लावता येणार नाही अशी ही सुधारणा होती. या अध्यादेशाचे रुपांतर नंतर कायद्यात करण्यात आले. परिणामी अर्थशक्तीचा प्रभाव वाढू शकतो. त्यामुळे सदर कायदा पूर्वी ज्या स्वरुपात होता तेच स्वरुप त्याला प्राप्त करून देण्यासाठी त्यात दुरुस्ती सुचवली गेले. परंतु, हे विधेयक मंजूर होण्यासाठी त्यावेळच्या जनता पक्षाने कुठलीही पावले उचलली नाहीत आणि मुदत टळून गेल्यावर ते रद्द झाले. मात्र आज निवडणूक आयोगालाच पुढाकार घेऊन खर्चाची मर्यादा ठरवणे क्रमप्राप्त झाले आहे.

### पैशाचा महापूर

राजकीय पक्षांकडून ज्या प्रकारे निधी गोळा केला जातो. विशेषत: निवडणुकीच्या काळात ज्या पध्दतीने हे सारे चाललेले असते ते पाहून राजकारण म्हणजे भ्रष्टाचार हे समीकरण लोकांच्या मनात अगदी पक्के बसले आहे. या परिस्थितीत निधी गोळा करण्यासंदर्भात काही ठाम तत्त्वे निश्चित करून त्यानुसार राजकीय पक्षांवर नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे, अशी मागणी गेल्या पन्नास वर्षांपासून सातत्याने होत आली परंतु, त्यात कोणत्याच राजकीय पक्षाने प्रामाणिकपणा दाखवला नाही. मोठमोठे उद्योगसमूह राजकीय पक्षांना देणग्यांच्या स्वरुपात मोठ्या रकमा देत असतात. या देणग्यांमुळे राजकारणात अपप्रवृत्ती वाढीस लागतात. कंपनी कायदे आणि एमआरटीपी कायदा यांच्या अनुषंगाने यासंदर्भात नेमलेल्या सच्चर समितीने आढावाही घेतला होता. आपल्या देशाच्या निवडणूक प्रक्रियेत अर्थशक्तीचे प्राबल्य वाढू लागल्याने निर्माण झालेल्या धोक्यांकडे त्यांनी लक्ष वेधले होते. या सगळ्या गोष्टींचा विचार करून कंपनी कायद्याच्या काही सुधारणा सुचविल्या गेल्या. देशातील विधानसभा आणि लोकसभा निवडणुकांचा अनुभव आणि निवडणूक प्रक्रियेतील अर्थशक्तीचा वाढता प्रभाव लक्षात घेऊन निवडणूक कायद्यात सुधारणा आवश्यक ठरली. जयप्रकाश नारायण यांनी १९७४ साली एक समिती नियुक्त केली. त्या समितीवर जबाबदारी होती. भारतातील निवडणुकांमध्ये होणारा पैशांचा वापर शासकीय अधिकारी आणि यंत्रणेचा गैरवापर, निवडणुकीतील इतर भ्रष्टाचार, प्रचलित निवडणूक पध्दतीनुसार प्राप्त होणारी मते यातील विसंगती आणि निवडणूक कायद्यातील उणीवा याचा त्यावेळी विचार झाला होता. निवडणुकीसंदर्भात सादर होणाऱ्या याचिकांवर निर्णय देण्यास होणारा विलंब तसेच मुक्त आणि निर्भय वातावरणात निवडणुका पार पाडून जनमत योग्यरित्या प्रकट व्हावे, यासाठी योग्य त्या उपायांची शिफारस उपरोक्त गोष्टींचा अभ्यास करून या समितीने आपला अहवाल सादर केला. या अहवालात लोकप्रतिनिधित्व कायदा १९५१ मध्ये अनेक सुधारणा सुचवल्या गेल्या. याचा अर्थ गेल्या पन्नास-साठ वर्षांपासून निवडणुकांमध्ये गैरव्यवहार पाण्यासारखा खर्च होणारा पैसा किंवा भ्रष्टाचार यासंदर्भात नुसतीच चर्चा होत राहिली. परंतु कार्यवाही काहीही झाली नाही. निवडणूक सुधारणांची कशी गरज आहे हे सांगत सर्वच राजकीय पक्ष व नेत्यांनी तो अहवाल त्यावेळी चांगलाच उचलून धरला होता. मात्र त्यासाठी आवश्यक ती पावले उचलली गेली नाहीत. निवडणूक उमेदवारांना निवडणूक खर्चाची एक विशिष्ट मर्यादा आखून देण्यात आली आहे. आपल्या निवडणूक खर्चाचा तपशीलही त्यांना सादर करावयाचा असतो. मग आपला निवडणूक खर्च या मर्यादेच्या आतच आहे हे दाखविण्यासाठी सर्वच राजकीय पक्ष वेगवेगळ्या युक्त्या प्रयुक्त्या करत असतात. सध्या सुरू असलेल्या विधानसभा निवडणुकांमधला पैशाचा महापूर पाहिल्यावर निवडणुका म्हणजे बड्या धेंडांचाच आखाडा आहे हे सिध्द होते.

### तरच लोकशाही टिकेल

खरे तर या सुधारणा करण्याच्या मूळ हेतूकडेच मोठ्या राजकीय पक्षांनी दुर्लक्ष केले. कोणतीही निवडणूक सामान्य माणसालादेखील लढविणे शक्य व्हावे हा त्यामागचा प्रमुख उद्देश होता. निवडणूक खर्चावर बंधन घालण्यात आलेले आहे. प्रत्यक्षात मात्र या बंधनांच्या अनुषंगाने काही वेगळेच परिणाम दिसून आले. निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराला खर्च करण्याबाबत मर्यादा घालण्यात आल्या. तरी त्याचा पक्ष, मित्र किंवा समर्थक यांना त्याच्या निवडणुकीसाठी खर्च करण्यावर काहीच मर्यादा घातल्या गेलेल्या दिसत नाहीत. सामान्य माणसाची निवडणूक लढविण्याची क्षमता हे तर भारतीय लोकशाहीच्या मूळ तत्त्वांपैकी एक आहे. उमेदवार अगर राजकीय पक्षांना धनाढ्य लोक पैसे देतात आणि मग त्याचे दुष्परिणामही दिसून येतात. अशी मदत करणारे लोक आपला अजेंडा राबविण्यासाठी राजकीय लोकांवर नेहमीच दबाव आणतात आणि पुन्हा हे भ्रष्टाचाराचे आणि निवडणूक गैरव्यवहाराचे दुष्टचक्र सुरू राहते. आता तर गुन्हेगारदेखील राजकीय मंडळींना मदत करू लागले आहेत. तेव्हा तर एक मोठा धोका समोर दिसू लागला आणि गुन्हेगारदेखील निवडणुकीत विजयी होऊ लागले. याचा अर्थ लोकशाहीचा आधारस्तंभ असलेल्या निवडणुका सध्या पैसा आणि गुन्हेगारीच्या तडाख्यात सापडल्या आहेत. यासाठी तातडीने निवडणूक कायद्यात सुधारणा करावी लागेल, खर्चाच्या मर्यादेबरोबरच सरकारने निवडणूक खर्चाची जबाबदारी उचलण्याची तयारी दाखवावी लागेल. तरच थोड्याफार प्रमाणात राजकारणाचे गुन्हेगारीकरण थांबवता येईल आणि लोकशाही टिकवता येईल.